
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ३७

प्रमोद प्रभाकर सडोलीकर
(१९६९–१९७६)

दि. १२ सप्टेंबर २०२१

इतक्या सर्व अनुभवांचे ‘निचोड’ काय? पूर्वी गोष्टीमध्ये असायचे की राक्षसाचा प्राण पोपटात आहे. त्या गोष्टीची मला आठवण येते. ग्रामीण विकासाचे प्रयत्न जर यशस्वी व्हायचे असतील तर त्या गोष्टीप्रमाणे गावचा प्राण ग्रामसभेत आहे हे लक्षात घ्यायला लागेल. ग्रामसभा जितकी ताकदवान, उत्साही, सर्वांना सामावून घेणारी, परिणामकारक व विकासोत्सुक तितके गाव बलवान व संपन्न होणार. एका प्रकल्पात मी काही गावांमध्ये एक वर्ष ग्रामसभा सशक्त व्हावी म्हणून प्रयत्न केले. तसेच ज्या गावांमधून स्थानिक नेतृत्व उभे राहते तेथे विकासाच्या सर्व योजनांना गती मिळते हे ध्यानात आले. बाहेरून टेकू दिलेली विकासाची कामे कितीही पैसे ओतले तरी आतून पोकळच राहतात.

विकासाची प्रेरणा आतूनच जागी व्हावी लागेल, ती तळमळ बाहेरून, योजनांमधून थोपविता येत नाही. ती कशी निर्माण होईल हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. काही ठिकाणी ती दिसते. काही ठिकाणी ती शून्यवत झालेली आहेत. योजना राबवून नुसते छापाचे गणपती स्थापन करून उपयोगाचे नाही, त्यात प्राण भरला पाहिजे. लोकसहभागाशिवाय तो निर्माण होणार नाही. ही आस्था व्यक्तीत, गटात, समाजात कशी जागी करायची याचे मुस्तकीम उत्तर नाही मात्र प्रयत्नाने ते साध्य होऊ शकेल हे नक्की!

मी चौथी पर्यंत एका छोट्या सरकारमान्य खाजगी शाळेत होतो. इयत्ता पाचवीला ज्ञान प्रबोधिनी व टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र मंडळ या दोन्ही ठिकाणी प्रवेश मिळाला होता. माझ्या वडिलांचे एक परिचित प्रबोध शाळेत होते. वडिलांनी आप्पांबद्दलही ऐकले होते, त्यामुळे त्यांनी प्रबोधिनीची निवड केली. आप्पा, आण्णा व यशवंतराव यांच्या सहवासातील ते मंतरलेले दिवस होते. आप्पांकडे बघत आम्ही घडलो, नंतर आण्णांचाही सहवास मिळाला हे सद्‌भाग्य! आप्पांकडे आडकाठी न येता सदैव प्रवेश असायचा. दर शनिवारी आप्पांना मी साप्ताहिक वृत्त द्यायचो. त्यानंतर आप्पा तासभर माझ्याशी माझ्या व्यक्तिगत आयुष्याबद्दल बोलायचे, मार्गदर्शन करायचे. म्हणून मी कवितेत म्हणतो -

**सा. न. वि. वि.**

**भाग्य म्हणू की देववशाने समीप तुमच्या आलो,**
**सरुपतेच्या सोपानावर किंचित अडखळलो ।।१।।**
**संकल्पांनी अवचित केव्हा मानस व्यापून गेले,**
**समर्पणाच्या वाटेवरती थकून हतबल झाले ।।२।।**
**'तुमची स्वप्ने अमुच्या स्फूर्ती' मानत इथवर आलो,**
**चक्रव्यूह अस्तित्वाचे भेदत जखमी झालो ।।३।।**
**अखंड अशा अजेय निष्ठा तेव्हा साक्षी झालो,**
**प्रेरणा जरा निमल्या थोडा हताश झालो ।।४।।**
**शांत निरव एकांती स्मरते तुमचे सलगी देणे,**
**सैरभैर मन होते वाटे पराजिताचे जिणे ।।५।।**
**असेल तर का ईश्वर त्याला घालावे साकडे,**
**विनायकाचे वाण पेलण्या बळ न पडो तोकडे ।।६।।**



**आण्णा तथा व. सी. ताम्हनकर , वा. ना. तथा भाऊ अभ्यंकर आणि यशवंतराव लेले**

आप्पांनी आम्हाला घडवले त्यामुळे आम्ही आज असे आहोत. माझे हस्ताक्षर लहानपणापासूनच चांगले म्हणून मला आप्पांनी सासवडला ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या प्रेमाताई कंटक यांच्याकडे आठवडाभर पाठवले. प्रेमाताई काही लेखन करत होत्या व त्या लेखनाची मुद्रण प्रत करायला मी मदत केली. १९७८साली काही मानसिक आंदोलनांचा काळ होता, त्यावेळेस विद्यमान संचालक गिरीशराव यांनी मला तीन-चार महिने त्यांच्या घरी मुक्कामी ठेवून घेतले होते. त्या काळात त्यांचा खूप सहवास व मैत्र लाभले.

**प्रशालेतील दिवस : 'ते हि नो दिवसा गता:'**

१९६९ ते १९७६ ही प्रशालेतील संस्मरणीय वर्षे होती. अनेक शिक्षक व त्यांच्या आठवणी आजही स्मरणात आहेत. इंग्रजीच्या सावरकर मॅडम, विलासराव चाफेकर, विनय हर्डीकर, आनंद हर्डीकर, डॉ. दुर्गाताई दीक्षित व अनेक शिक्षक. गणित-शास्त्र या विषयांशी माझे फारसे सख्य कधी जमले नाही. The Distance between these two....is negligible and hence the theorem is proved अशा अभ्यासविषयांत माझ्या calculations मधील ते अंतर कधीच negligible नसायचे! त्यामुळे शास्त्र विषयांच्या वाट्याला नंतर मी फारसा गेलो नाही! पाचवी-सहावीमध्ये इंदुरकर सर आम्हाला होते, उंचच्या उंच आणि ताठ चालणारे. त्यांचे अक्षर अतिशय सुंदर होते. वर्गात शंका विचारताना हात सरळ १८० अंशात वर करून प्रश्न विचारायचा नाही, कोपरातून वाकवायचा आणि बाकावर ९० अंशात ताठ उभा करायचा असे त्यांनी करवून घेतले, शाईपेनाचे टोपण उघडे असेल तर पेन धरताना त्याचे टोक वरच्या बाजूला धरायचे अशा अनेक छोट्या-छोट्या गोष्टी शिकवल्या त्या आजही लक्षात आहेत. चाफेकर सरांनी Great Escape चित्रपटाची कथा सांगितली ती आजही आठवते, अर्लीनताई पळशीकर यांनी let आणि late या उच्चारातील फरक रविंद्रनाथ टागोरांची Into that heaven ही कविता शिकवताना समजून सांगितला ते आठवते. मालतीताई दीक्षित विजय इनामदारच्या अक्षराला cultured मोती व दुसऱ्या अक्षर चांगले नसणाऱ्या मुलाच्या अक्षराला natural मोती म्हणत असत. जोगळेकर सरांनी geometry च्या तासाला number line infinite ही कन्सेप्ट समजावली ते आठवते. अशोकराव आमचे वर्ग शिक्षक होते त्यावेळेस त्यांनी मला कसे समजून घेतले व मदत केली ते आठवते.



**कै. आ. विलासराव चाफेकर**

प्रशालेतील आणखी एक अनुभव प्रकल्पाचा. अनेकांनी त्यांच्या गोष्टीत अशा प्रकल्पांचा उल्लेख केला आहे. त्यावेळेस ६वी पंचवार्षिक योजना भारतात प्लॅनिंग कमिशन तर्फे चालू होती. (आता प्लॅनिंग कमिशन अस्तित्त्वात नाही, त्याऐवजी निती आयोग आहे). या योजनेबद्दल मी छोटा प्रकल्प केला. रा. स्व. संघाचे प्रा. श्रीपती शास्त्री यांनी मोतीबागेत येऊन बसण्यास सांगितले. संघाच्या कार्यालयात येणारी त्या वेळची सर्व वृत्तपत्रे-मासिके वाचून, टिपणे काढून, कात्रणे जमवून त्याआधारे प्रकल्प पूर्ण केला. नववीमध्ये असाच नाझीवादावर अभ्यास प्रकल्प केला त्याला दुसरे पारितोषिक मिळाल्याचे आठवते.

त्यावर्षी भाई (विवेकानंद फडके) आमच्या वर्गाचा मार्गदर्शक होता. भाईच्या सहवासामुळे मी आज जो आहे, तो बनलो असे म्हणणे वावगे ठरणार नाही. नाहीतर काहीतरी शिकून, नोकरी करून मी पोटापाण्याला लागलो असतो. भाईच्या संवादातून मी कोण, मला काय करायचे आहे, श्रेय काय, प्रेय काय असे विचार मनात पेरले गेले. भाईचे आमच्या वर्गावर विशेष प्रेम होते. अवघड वाटणाऱ्या, बोलू का नको अशा विषयावरही कोणताही आडपडदा न ठेवता तो थेट संवाद करायचा. जणू काही राख जमलेली असावी आणि त्याला फुंकर मारून व्यक्तीच्या मनातील प्रेरणारूपी अग्नीला पुन्हा चेतवावे, असे माझ्या बाबतीत त्याने काहीसे केले असावे. त्याची आजही प्रकर्षाने आठवण येते.


**मी आणि वर्गमित्र**

इयत्ता ९वी पर्यंत मी तसा बुजराच होतो. नववी नंतर मी व आणखी चौघांनी वाणिज्य हा विषय घेतला. प्रबोधिनीने आमच्या चौघांसाठी स्वतंत्र शिक्षकांची व्यवस्था केली. दास्ताने सर, नवलगुंदकर सर असे आम्हाला चौघांना शिकवण्यासाठी येत. म. शं. आठवले सर मौनी विद्यापीठातून त्याच वेळेस आले व वाणिज्य विषय त्यांनीही आम्हाला शिकवला. शालेय शिक्षण पूर्ण होताच मी आणि अजित कानिटकर तमिळनाडूमध्ये हातपंप बसवायला गेलो होतो. त्यावेळेस आप्पांनी माझा व अजितचा प्रवेश वाणिज्य शाखेत निश्चित करून टाकला म्हणून मी वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतले. शाळेत शिकवायला येणारे प्रा. म. शं. आठवले, प्रा. दास्ताने, प्रा. नवलगुंदकर यांच्याशी नंतरही अनेक वर्षे संपर्क राहिला. चंदूकाका रायरीकर आणि आठवले सर असे आम्ही तिघे नंतरही अनेकदा भेटत असू.

त्यावेळेस प्रशाला दलाचे मोहनराव व अन्य शाळांतील मुलांच्या प्रबोध दलाचे शरदराव सुंकर प्रमुख होते. त्यावेळेस डेक्कन जिमखाना भावे स्कूलमध्ये व त्या आधी आपटे प्रशालेमध्ये चालणाऱ्या गांधी दलाचा मी प्रतोद होतो. प्रबोधिनीत पहिली फटाके विक्री प्रबोध विभागात सुरू झाली, त्यात मी सहभागी होतो. महाराष्ट्रात अभ्यासदौरा करायचा ठरला. आम्ही सर्वच जण मध्यम वर्ग किंवा कमी आर्थिक स्तरातील, पैसे कसे आणायचे? त्यावर फटाके विक्री करून काही नफा मिळवून मग त्यातून अभ्यासदौरा करू असे ठरले. दौऱ्याचा शेवट पवनारला पूजनीय विनोबाजी भावे यांना भेटून त्यांच्या आश्रमात झाला. हा सर्वच अनुभव प्रेरक होता. युवक विभागाचे महाराष्ट्रव्यापी विस्तार शिबिर झाले त्यात मी अकोला व औरंगाबाद येथे सहभागी झालो.

मॉर्डन महाविद्यालयात असताना Economics Learning Student's Alliance (ELSA) हा गट मी सुमारे वर्षभर सुरू करून चालवला. विविध महाविद्यालयांतील १०० - १५० जण महिन्यातून दोनदा एकत्र जमायचो, व्याख्याने-चर्चा व्हायच्या. मी बी. कॉम. होऊन बाहेर पडल्यावर हा गट जमण्याचे थांबला पण त्या वर्षात वेगवेगळे उपक्रम झाले. त्यातीलच दोन मित्र म्हणजे ॲड. मकरंद आडकर व लघाटे. लघाटे प्रबोधिनीत व्यापार उद्योग विभागात कामासाठी आला होता.

बी. कॉम. उत्तीर्ण झाल्यावर मी एम.ए., अर्थशास्त्र या विषयात पदवी परीक्षा पूर्ण केली. मला ज्या प्रकारे ग्रामीण व सामाजिक क्षेत्रात काम करायचे होते त्या दृष्टीने अर्थशास्त्र, समाजशास्त्र व राज्यशास्त्र या तीनही विषयांचा अभ्यासक्रम शिकवणारी टि. म. वि. ची ही पदवी मला योग्य वाटली.

**प्रबोधिनीचे 'पाणी'**

प्रबोधिनीत कळत नकळत अनेक संस्कार होत होते. संघटनेचे बाळकडू येथेच मिळाले. नंतर कधीतरी ते प्रकटायचे आणि बरोबरचे अनेकजण बोलूनही दाखवायचे की हे 'प्रबोधिनीचे पाणी आहे बरं का'! हार्दिक्याने सर्वांना बरोबर घेऊन मत मतांतराच्या पलीकडे जाऊन एकत्र काम करण्याची शिदोरी आयुष्यभर पुरली.

प्रबोधिनीतील व युवक विभागात आत्मसात केलेल्या संस्कारांची धारणा कायम सोबत राहतेच. त्यामुळे बाहेर काम करताना मी सांगत नाही तरी हे 'प्रबोधिनीचे पाणी' आहे, अशी आपसूकच ओळख होते. माझा हिंदुत्ववादी विचार त्यामुळे सर्वांना परिचित होता. काहीवेळा त्यावरून चेष्टाही केली जायची. एक प्राध्यापक मला हेटाळणीच्या पण काही मैत्रीपूर्ण संबंध

असल्याने 'हिंदोळ्या' म्हणून हाक मारायचे. पण त्याने मला काही फरक पडला नाही, माझी बांधिलकी मी कधीही लपवली नाही. माझे सर्वपक्षीय विचारधारातील कार्यकर्त्यांबरोबर जाणे-येणे चालू होते-आहे. आजवरच्या प्रवासात कोण कोठल्या विचारसरणीचा याचीही फारशी अडचण वाटली नाही. धुळ्याचे कॉम्रेड शरद पाटील व मुंबईच्या TISS मधील प्राध्यापिका व तज्ज्ञ छाया दातार यांच्याशी संपर्क, एकत्र काम व मोकळेपणाने संवाद झाले. ग. प्र. प्रधान यांच्या प्रसिद्ध 'साता उत्तराची कहाणी' या कादंबरीतील मित्रांप्रमाणे तत्त्वज्ञानात मतभेद असले तरी मैत्रीपूर्ण संबंध ठेवता येऊ शकतात.

**प्रबोधिनीत आपण जाती मानत नाही. 'जाती पाती जुनाट भिंती मोडून टाकू घडवू क्रांती' अशी घोषणा आपण दिली होती. एकदा मराठवाड्यातील एका गावात ग्रामसभेसाठी आम्ही सर्वजण जमलो होतो. अचानक वादळी वारे व पाऊस सुरू झाला व त्यामुळे उघड्यावर सुरू असलेली ग्रामसभा विस्कळीत झाली. बहुसंख्य सभासद समोरच्या हनुमान मंदिरात आडोशाला गेले. मलाही येण्याबद्दल विचारणा झाली. पण मला क्षणभरात लक्षात आले की ग्रामसभेतील (एका समाजाची) काही मंडळी मात्र पावसातच भिजत थांबली, मंदिरात गेली नाहीत! मी ही त्यांच्याबरोबर थांबलो व पावसात भिजलो. दुसऱ्या दिवशी (मंदिरात आश्रयास गेलेल्या) समाजातील एक मान्यवर काहीशा शरमिंदा नजरेने भेटले व म्हणाले, ''क्षमा असावी''. मी म्हटले ''तुम्ही तुमच्या पद्धतीप्रमाणे वागलात, आम्ही आमच्या''. बाहेर थांबण्याचा माझा निर्णय on the spur of the moment होता. मनात कोठेतरी प्रबोधिनीने शिकवलेले बाळकडू रुजले होते.**

मला वाटते १९९४-९५ चा काळ असावा. मला व्यवसायासाठी पैशाची निकड होती. एका परदेशी बँकेने माझे पाच लाखाचे कर्ज मान्य केले पण कर्जाचे वितरण करताना certificate of varnaculation वर आणखी एक जास्तीची सही करण्यास सांगितले. मी कारण विचारता माझी सही मराठीत असल्यामुळे माझ्याकडून ते घेत असल्याचे त्यांनी सांगितले. हे सारे अपमानास्पद आहे असे मी त्यांना सांगितले व मान्य झालेले कर्ज 'बाणेदारपणे' नाकारले. त्याकाळी त्रास झाला पण पुढे आयुष्यभर स्वतःवर खुश होऊन जगलो.

मालेगावला असाच गमतीशीर अनुभव. ४०,००० हातमागांचे सर्वेक्षण करायचे काम होते. मी चार महिने तिथेच राहिलो. माझ्या सर्वेक्षणात मदत करायला ४० युवक - २० हिंदू, २० मुस्लिम समाजातील! या ४० जणांच्या संचाला बरोबर घेऊन हार्दिक्य व विश्वास ठेवून यशस्वीरित्या काम पूर्ण झाले! पुन्हा 'प्रबोधिनीचेच पाणी!'

### घाटापलीकडे शिवगंगा खोरे

१९७७-७८ नंतर, महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर कात्रज घाटापलीकडे प्रबोधिनीच्या शिवगंगा-गुंजवणी खोरे विकास योजनेच्या कामात मला आप्पांनी कामासाठी जाण्यास सांगितले. रामभाऊंच्या हाताखाली कृषीतांत्रिक विद्यालयाचे बांधकाम चालू असताना, त्यांना मदत केली. बांधकामासाठी लागणाऱ्या विटांची वीटभट्टीही मी लावली! I got immersed in a variety of experiences. ग्रामीण विकासाची पहिली ओळख इथे झाली. त्यासाठी लागणारी मनोवृत्ती माझी प्रबोधिनीत घडत गेली. आण्णांकडून अनेक गोष्टी शिकत गेलो. त्यांना गावातले लोक कसे मान देतात हे पाहिले. आण्णा म्हणजे perfection personified! पंतप्रधान मोरारजी देसाई भेटीच्या वेळेस मी त्यांचा स्वीय साहाय्यक होतो. सर्व विभागांची प्रदर्शने मांडली होती. युवती विभागातर्फे 'रसमयी' उद्योग, व त्यांनी केलेल्या खाद्यपदार्थांचा स्टॉल मांडण्यात आला होता. त्या ठिकाणी उत्तम सजावट व मांडणी केली होती. आण्णांच्या बारीक नजरेने एक गोष्ट न्याहाळली. 'सर्व काचेच्या बाटल्या मधील द्रावणांची पातळी सारखी असेल असे बघा!' अशी सूचना त्यांनी केली.



**रसमयी उद्योगाचा स्टॉल**

शिवापूरला कधी-कधी आण्णांना सकाळी ७ वाजता मी Jawa या मोटरसायकलवरून न्यायचो. मागे बसून प्रवासात त्यांचे गीतापठण चालायचे. जेवतानाही त्यांचे अखंड काम चालू असायचे. त्यांच्या एका मोठ्या अपघातातून बरे झाल्यावर पहिल्या दिवशी ते माझ्या घरी जेवायला आले होते. आप्पांच्या सांगण्यावरून मी शिवापूरला राहायला गेलो. दोघांच्याही असंख्य आठवणी आहेत. आण्णांची ग्राम विकासासाठी Commitment अफाट होती. Bridge on river K अशा गोष्टी तुम्ही ऐकल्या तर चमत्कारिक वाटतील. हा माणूस स्तिमित करणारा होता. नंतर असा माणूस होता असे सांगितले तर कदाचित आश्चर्य वाटेल. त्यांनी अठरा महिन्यात पीएच.डी. पूर्ण केली. ते कधीच कारणे सांगत बसले नाहीत. आण्णा म्हणाले आठ वाजता गाडी शिवापूरला निघेल तर आठ वाजता आण्णा पहिला गियर टाकायचे. शरीराला साधन म्हणून वापरणे हे आम्ही त्यांच्याकडून शिकलो. त्यांच्यासारखे जमले मात्र नाही. मला राहिलेली रुखरुख म्हणजे हराळीला प्रबोधिनीच्या कामात आण्णा तिथे

असताना त्यांच्याकडे पुन्हा काम करावे अशी इच्छा होती. ते मात्र राहून गेले.

प्रा. रामभाऊ यांच्याकडून ग्रामीण विकासाबाबतचे दृष्टीकोन (approaches) आत्मसात केले. शिवगंगा खोऱ्यात आपण गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला. त्यावेळी सर्व गावांमध्ये तो उत्सव घडून येईल यासाठी मी प्रयत्न केले. त्यानिमित्ताने अनेक तरुण मंडळांची स्थापना या भागात केली. ससेवाडीच्या प्रकल्पातही श्रमदान आणि अन्य कामे करताना मी नकळत घडत गेलो.

ससेवाडीत एकदा आपला एक कार्यकर्ता काम करत होता. त्याला गाव काही स्वीकारत नव्हते. एके दिवशी तो ज्या घरी जेवायला जायचा तिथल्या दोन खोंडांची (बैलांची) मारामारी झाली आणि एका खोंडाचे शिंग तुटले. भळाभळा रक्त वहायला लागले. लोकांना काही सुचले नाही. तेव्हा याने पटकन हळद-चुना लावला. दुसऱ्या दिवसापासून हा गावातील लोकांचा ताईत झाला. लोक तुम्हाला कसे स्वीकारतील याचे शास्त्र नाही पण तुम्ही त्यांच्या उपयोगी पडलात तर ते नक्की तुमचा स्वीकार करतात.

## ग्रामीण विकास हेच आयुष्यभराचे कार्यक्षेत्र

प्रबोधिनी प्रशालेतील फार थोडे मोजकेच युवक व युवती ग्रामीण विकास हे कार्यक्षेत्र स्वीकारून त्यात कार्यरत आहेत. माझ्या माहितीप्रमाणे राजीव बसर्गेकर अनेक वर्षं शेतकरी संघटनेचे काम करत आहेत, सुवर्णाताई गोखले महिलांसाठी आणि स्वेच्छा निवृत्तीनंतर अभिजीत व गौरी कापरे हराळी येथे. बाकी अनेक जण उच्च तंत्रज्ञान उद्योग, संशोधन यात आहेत. मी गेली चाळीस वर्षं हे क्षेत्र निवडून यात आहे. याची सुरुवात कशी झाली? १९७८ मध्ये टायफॉइडने मी आजारी पडलो तेव्हा आप्पांनी शिवापूरला जाऊन राहायला सुचवले. तेथील मोकळी हवा व वातावरणात मी बरा होईन असे त्यांना वाटले. ग्रामीण भागाची ही पहिली ओळख होती. त्याच काळात व नंतर आण्णा आणि रामभाऊ यांच्याकडून खूप शिकायला मिळाले. वर्षभर मी शिवापूरला जाऊन राहिलो. गाऊडदरा गावात शाळेचे बांधकाम करणे, शिवगंगा खोऱ्यातील गावांमध्ये तरुण मंडळाची स्थापना करणे, खोऱ्यातील गावात गणेशोत्सवाचे संयोजन करणे, अशी विविध कामे करत गेलो. ही कामे करताना ग्रामीण समाजाबद्दल काय विचार व संकल्पना असायला हवी, याची दृष्टी तयार होत गेली.

आपण बऱ्याचदा शहरी नजरेतून गावाकडे पाहत असतो. माझा ग्रामीण विकासासाठी पूरक दृष्टीकोन तयार करण्यात रामभाऊंचा मोठा वाटा आहे. रामभाऊ डिंबळे यांनी सांगितलेला अनुभव त्या दृष्टीने संस्मरणीय आहे. NSS च्या काही महाविद्यालयीन युवक-युवतींना घेऊन ते शिवापूर परिसरात एका शिबिरास गेले होते. सर्वजण डबे खायला बसलेले असताना एक व्यक्ती समोरून आली. त्यामधील शहरी पांढरपेशा संस्कृतीत वाढलेल्या एका युवतीने नकळत प्रतिक्रिया दिली -Look how dirty he is रामभाऊंनी युवतीस लगेच सांगितले -He is not dirty, he is dusty! ग्रामीण भागात डांबरी रस्ते नसल्याने तो फक्त धुळीने माखलेला आहे, गलिच्छ किंवा अस्वच्छ अजिबात नाही! हे वाक्य माझ्या कायम स्मरणात राहिले. शहरी मापदंड ग्रामीण भागात काम करताना उपयोगाचे असणार नाहीत, हा त्या प्रसंगातून मोठा धडा होता.

ग्रामीण विकास यातच माझे करिअर झाले. नसरुद्दीन शहाला कोणा एका पत्रकाराने विचारले की 'तू यशस्वी अभिनेता नसतास तर कोण असतास?' त्यावर त्याने मार्मिक उत्तर दिले. 'निश्चितच अयशस्वी अभिनेता असतो.' स्वत:च्या क्षेत्राशी Commitment दाखवणारे ते उत्तर होते. माझ्या बाबतीत तसेच मी म्हणतो. ग्रामीण विकासातील माझ्या हातून जे काम घडले ते झाले नसते तर मी काय केले असते? तर ग्रामीण विकासातील मी एक दगड राहिलो असतो!

## प्रत्यक्ष काम, सामाजिक संशोधन व प्रशिक्षण : कामातील त्रिसूत्री

आप्पांनी शिवगंगा खोऱ्यात पाठवले तेव्हा ग्रामविकासाच्या माझ्या कामाला सुरुवात झाली असे मी म्हणेन. प्रत्यक्ष सामाजिक संशोधनाचे काम १९८४ साली मी टप्प्याटप्प्यात सुरू केले. माझ्या ४० हून अधिक वर्षांच्या ग्रामीण भागात काम करण्याच्या कारकिर्दीत मी प्रत्यक्ष कृती कार्यक्रम, सामाजिक संशोधन व प्रशिक्षण अशी तिहेरी कामे केली. ईशान्य भारत, काश्मीर व हिमाचल प्रदेश वगळता बहुतेक सर्व भारतात काम करता आले.

जागतिक बँकेच्या एका प्रकल्पात पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने चौदा गावांमध्ये ५५० संडास बांधण्याचे काम गावकऱ्यांच्या मदतीने केले. 'स्वच्छ भारत' मोहीम सुरू होण्यापूर्वी वीस वर्षं आधी आम्ही हे काम केले. अनेक गावांमध्ये पाणी वापर करणाऱ्या शेतकऱ्यांचे गट बांधून त्यातून Water Users Association (WUA) स्थापन करणे व त्यानंतर या WUA ने गावातील पाण्याचे वाटपाचे नियोजन करणे हे काम मी केले. जर्मन सरकारच्या महाराष्ट्रातील प्रकल्पांमध्ये असे समुदाय बांधणीसाठी तज्ज्ञ म्हणून मी बरेच वर्षं होतो. दुसऱ्या एका प्रकल्पात गावांमधील ग्रामसभा बळकट करणे, खऱ्या अर्थाने अशा ग्रामसभेने गावाच्या विकासाचे नियोजन करून त्याची पूर्ण जबाबदारी स्वीकारणे असे काम होते. जागतिक बँकेसाठी १९९६

## गावपातळीवरची प्रशिक्षणे व भेटी







ते १९९९ असे तीन वर्षं काम केले. या निमित्ताने पंधरा गावांमध्ये प्रादेशिक पाणी पुरवठा योजने संदर्भात काम करता आले.

अशा प्रकल्पांच्या निमित्ताने स्वयंसेवी क्षेत्रातील महाराष्ट्रातील सर्व दिग्गजांबरोबर थेट संपर्क व एकत्र कामाची दुर्मिळ संधी मिळत गेली. त्यामध्ये अफार्मचे डॉक्टर मुकुंद घारे, मा. आण्णा हजारे, म्हैसाळ प्रकल्पाचे श्री. मधुकरराव (दादा) देवल, श्री. पोपटराव पवार अशी अनेक नावे सांगता येतील. मी तर विनोदाने म्हणतो, की एक विजयअण्णा बोराडे (औरंगाबाद) सोडले तर ग्रामीण विकासातील सर्वच 'आप्पा' व 'आण्णा' यांच्याबरोबर मी कधी ना कधी काम केले आहे!


स्वयंसेवी संस्थेतील अनेक कार्यकर्त्यांचेही प्रशिक्षण कार्यक्रम घेतले. प्रशिक्षणाचे बाळकडू मला शरदराव सुंकर यांच्याकडून मिळाले. त्यांच्या बरोबर सुरुवातीच्या काळात मी खूप प्रशिक्षण शिबिरे घेतली आहेत. शरदरावांनी प्रशिक्षणाचा नियमच केला होता की गावातील कोणतेही प्रशिक्षण चार तासांहून जास्त ठेवायचे नाही. गावातील महिला व पुरुषांना शेती, घर, जनावरे यांची कामे असतात. त्या व्यवधानाने त्यांचे लक्ष चार तासांहून जास्त सलगपणे एकाग्र होऊ शकत नाही. त्यावेळेस स्वयंसेवी संस्था या voluntary organisation होत्या अजून त्यांचे स्वरूप NGO व्हायचे होते! त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अनौपचारिक संवाद व वेगळे वातावरण असायचे. शासकीय अधिकाऱ्यांसाठीही मी प्रशिक्षणे घेतली. सुभाषराव देशपांडे, शरदराव सुंकर यांच्याबरोबर ही प्रशिक्षणे घेण्याचे काम झाले. अनेक विषयांवर प्रशिक्षणाच्या नवीन पुस्तिका तयार करण्याचे काम मी केले आहे.

### संशोधनाचे काम

माझ्या कंपनीतर्फे (Empirical Research Agency Pvt. Ltd.) मी गेले पंचवीस वर्षे सामाजिक क्षेत्रातील संशोधनाचे अनेक प्रकल्प देशभरातील नावाजलेल्या संस्थांसाठी केले. गोखले इन्स्टीट्यूट, जर्मन बँक, BAIF (बायफ), महाराष्ट्र राज्य शासन, भारत सरकारची काही मंत्रालये, यशदा, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, ग्रामायन, जानकीदेवी बजाज संस्था यांसारख्या अनेक संस्थांबरोबर कामाची संधी मिळत गेली. NCAER, IIE अशा शैक्षणिक संस्थांबरोबर देखील काम करण्याची संधी मिळाली. माझ्या कामातील यशाची पावती म्हणजे या सर्वांबरोबरच अनेक वर्षे पुन्हा-पुन्हा कामे करत गेलो. केवळ एकदा काम करून दिले व संबंध संपला असे झाले नाही. कदाचित माझ्या कामातील दर्जा व वक्तशीरपणा यामुळेच ते असेल.




मी जेव्हा सामाजिक संशोधन वा सर्वेक्षणाचे काम सुरू केले तेव्हा संशोधकांना विश्वासार्ह डेटा मिळणे दुरापास्तच होते. संगणकांचा आजच्या इतका प्रसार झाला नव्हता. मिळणाऱ्या माहितीची अचूकता सांभाळणे व प्रामाणिकपणे त्याचे विश्लेषण करण्याच्या पद्धती अनुभवातूनच काम करत-करत शिकत गेलो. त्यामुळे सर्वच ठिकाणी पुन्हा काम करण्याची निमंत्रणे येत गेली. एका IFAD च्या प्रकल्पावर त्यातील संशोधकाने महाराष्ट्रातील माझ्या कामाचा दर्जा पाहून हरियाणात गुडगाव जवळील मेवात या ठिकाणी मुद्दामहून पुढच्या सर्वेक्षणासाठी बोलावून घेतले. त्यांना त्या ठिकाणी कोणीही सर्वेक्षक मिळाला असता पण त्यांनी महाराष्ट्रातून मला बोलावून घेतले. महाराष्ट्र CAG च्या अहवालावर विधानसभेत चर्चा झाली. संगणक, बिग डेटा मायनिंग सारखी काही साधने नसताना १९८४ पासून माझी कामे पद्धतशीरपणे चालू आहेत.




यापूर्वी (सुनील दाढे यांच्या गोष्टीतील) उल्लेख झाल्याप्रमाणे CAG नागपूर कार्यालयासाठी शेतकरी आत्महत्यांची कारणमीमांसा शोधणारे प्राथमिक सर्वेक्षण व त्यावरचे वृत्त हे काम मी केले होते. या कामाचे वैशिष्ट्य म्हणजे शासकीय पद्धतीतील निविदा व स्पर्धेमध्ये उतरून हे काम मिळवले. पण त्याहीपेक्षा अवघड गोष्ट म्हणजे ४५/४६ हजार कुटुंबांना भेटून, प्रश्नावली देऊन, भरून घेऊन, त्या माहितीचे संकलन व विश्लेषण करायचे होते! हे सर्व काम मी ४५ दिवसांत पूर्ण केले. दुसरे असेच महत्त्वाकांक्षी काम म्हणजे महाराष्ट्र व गुजराथ मधील १३५ तालुक्यांतील एकात्मिक बाल विकास कार्यक्रम योजनेतील (ICDS) अनुभवांचे मूल्यमापन करण्यासाठीचे सर्वेक्षण. ही गोष्ट १९९०-२००० मधली आहे, ज्यावेळेस सर्वेक्षणासाठी सी.ए.पी.आय. इत्यादी टूल्स उपलब्ध नव्हती. सर्व काम कागद-पेन्सिलने प्रश्नावल्या हाताने भरून घेऊन मग संगणकावर त्याचे नोंदणीकरण करावे लागे. त्यानंतर त्याचे विश्लेषण करावे लागे. अशा मोठ्या सर्वेक्षणात काही चुकाही घडू शकतात. त्याला आम्ही Within Permissible Limits असा शब्द वापरतो. अशा 'नोंदीतील चुका' मर्यादेच्या आत असल्या तर विश्लेषण व निष्कर्षांवर फारसा परिणाम होत नाही. हॉलंडमधील एका प्राध्यापकांसाठी आणखी एक वेगळे काम केले. 'सामाजिक पार्श्वभूमी व संस्कारांचा माणसांच्या निर्णयप्रक्रियेवर होणारा परिणाम' असा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. तेही काम उत्तम झाले. हे मानसशास्त्राच्या विषयातील काम होते.

पुणे जिल्हा परिषदेसाठी सोळाशे बायोगॅसचा सर्व्हे मी केला. तेही काम उत्तम झाले. आपण प्रबोधिनीत नेहमी नवीन काही सुचले का असे विचारतो. या कामात आम्ही फक्त किती गोबरगॅस यंत्र चालू व बंद आहेत एवढ्या पुरते मर्यादित न राहता जी यंत्र बंद आहेत त्यांच्या तांत्रिक उणीवा कोणत्या व ती यंत्र चालू करण्यासाठी अंदाजे किती खर्च येईल याचा अदमास बांधण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी वेगळ्या पद्धतीने प्रश्नावलींची रचना केली. माझे मित्र रवींद्र देसाई व डॉ. राजस परचुरे यांनी मला यासाठी मोलाची मदत केली.

असे वाटते की आपण सर्व इतके काम करतो त्याचा खरेच उपयोग व्हायला हवा. साळुंब्र्याला दहा गावांचा एक सर्व्हे मी जानकीदेवी बजाज संस्थेसाठी करून दिला. दहा वर्षांनी त्यांचा पुन्हा फोन आला आणि त्यांनी एका वेगळ्या कामासाठी दहा वर्षे जुना सर्व्हे कसा उपयोगात आणता येईल अशी माझ्याशी चर्चा केली. मी त्यांना त्यावर नव्याने काम करून दिले. आपण जमवलेल्या महितीचा पुढे नियोजनासाठी कसा उपयोग होतो आहे हे जाणून घेण्याची मलाही नेहमीच उत्सुकता असते. जेव्हा-जेव्हा संधी मिळाली तेव्हा-तेव्हा मी त्यातही सहभागी झालो.

काही मोजक्या वेळेस अगदी परिचित व्यक्ती आणि राजकीय पक्षांसाठी मतदारांचा कौल अजमावणे अशीही सर्वेक्षणाची कामे केली. पण व्यापारी संस्थांसाठी 'अमुक टुथपेस्टला कोण ग्राहक आहेत' किंवा 'अमुक गाडीला बाजारात कोण संभाव्य प्रतिस्पर्धी आहेत' अशी industrial market survey ची कामे मी कटाक्षाने केली नाहीत!

**I visited many people and places!**

माझ्या कामाच्या निमित्ताने अनेक जागा आणि व्यक्ती यांना भेटलो. प्रत्येक वेळेस माझी शिकण्याची भूमिका कायम ठेवली. मी कोणीतरी एक द्रुढ्ढाचार्य आहे अशा भूमिकेत वावरलो नाही. तुम्हालाही काम करताना लोक जोखत असतात. नाणे खरे व खोटे याची शहानिशा ते करीत असतात. त्यांच्या नजरेत तुम्ही उत्तीर्ण झालात तरच स्वीकारले जाता, अन्यथा नाही. ठाणे जिल्ह्यात फिरत असताना तेथील समाजजीवन व त्यातील मार्क्सवादी दृष्टिकोनातून वर्ग विग्रह काळुराम दोधडे या आदिवासी कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी खूप छान स्थानिक आदिवासी आणि सावकार यांचे उदाहरण देऊन सांगितला.



## सर्वेक्षण भेटी






बीड जिल्ह्यात काम करताना एका शासकीय अधिकाऱ्यांची कामाची प्रचंड तडफ अनुभवली. पंधरा मोठ्या व मध्यम सिंचन प्रकल्पांच्या प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या पुनर्वसनासाठी हा अधिकारी अक्षरशः जीपमधून दिवस-रात्र फिरत होता. शासकीय अधिकारी 'कामचुकार' असतात असा ग्रह व पूर्वसमजुतीला सपशेल आव्हान देणारा हा अनुभव होता. एके ठिकाणी सर्वेक्षणाला गेलो असताना आम्हाला घेराव घालण्यात आला. तब्बल साडेचार तास आम्ही त्यामध्ये अडकलो होतो. दुसऱ्या ठिकाणी कोळसा खाणीचे काम चालू असलेल्या गावात, तेथील प्रचंड विरोधामुळे धूम ठोकून माघार घ्यावी लागली. मध्यप्रदेशात कामासाठी गेलो तेव्हा कळले की बिरबलाचे गाव पंधरा किलोमीटर अंतरावरच आहे. अंगावर रोमांच आले, मुद्दाम वेगळी वाट करून त्या घोन्गरा गावातील परिसर पाहून आलो. कोयना धरणाच्या मागे असवली गावात सर्वेक्षणाला गेलो तेव्हा पोटदुखीने मी आजारी पडलो तेव्हा एका वृद्ध महिलेने भात व त्याबरोबर गोडेतेल असे जेवण देऊन माझा आजार बरा केला. बांबू पासून बनवल्या जाणाऱ्या एका वाद्याच्या मी खूप दिवस शोधात होतो. मध्यप्रदेशात पाटी नावाचा एक भाग आहे. तिथले आदिवासी ते बांबूपासून वाद्य बनवतात असे मला समजले. मी ते कुठे मिळते आहे का याचा शोध घेतला. एकाकडे ते वाद्य होते. त्याला मी म्हटले की किती पैसे द्यायचे? त्याने सहज जंगलात जाऊन बांबुला कोयता मारून ते वाद्य बनवलेले होते. त्याला किंमत ठरवता येईना. मीच त्याला मग दिवसाचा रोज विचारला. तो म्हणाला, एक दिन का पचास रुपिया और आने-जानेका २० रुपिया. मग मी त्याला म्हटलं तुला ७० रुपये देतो आणि मी ते वाद्य विकत घेतले.

ठाणे जिल्ह्यात आदिवासी वस्त्यांमध्ये एका पाड्यावर असाच विलक्षण अनुभव आला. वस्त्या लांब-लांब डोंगरावर चढ-उताराची वाटचाल करून जाण्याच्या होत्या. माझ्याबरोबर वस्तीतील एक आदिवासी होता. सर्वच ठिकाणी गेल्यावर लक्षात आले की घरातील माणसे अगदी सकाळी दारू पिऊन तर्र आहेत. सकाळी हे दृश्य जरा विचित्र वाटत होते. मग बरोबरच्या मार्गदर्शकाला विचारले की हे असे का आहे? त्याने शांतपणे सांगितले, आज सकाळी माझा बा गेला. त्याला पोचवून आल्यावर आमच्या प्रथेप्रमाणे सर्वांनी दारू प्यायली आहे. आदिवासींमध्ये दारू पिण्याची पूर्वापार प्रथा आहे. तो Taboo नाही. त्याहीपेक्षा स्वतःच्या वडिलांचे निधन झाल्याची बातमी त्याने शांतपणे मला सांगितली आणि तो त्याही स्थितीत माझ्यासोबत काम करत फिरतोय हा दुसरा न विसरणारा धडा होता. असे कितीतरी प्रसंग सांगता येतील.

**तुम्ही तुमचे ज्ञानचक्षु आणि कवाडे उघडी ठेवून वावरलात तर अनेक गोष्टी कळतात.** मी जालन्यामध्ये शिवार फेरी करत असताना तिथला पोलिस पाटील मला म्हणाला, साहेब, तिकडे पाण्याचा तुंब होतो. पाणी साठते असे आपण म्हणतो, 'तुंब होतो' असा शब्दप्रयोग आपण सहसा करत नाही. मला चटकन आठवले समर्थ रामदास हे देखील जालन्याचे. त्यांच्या लेखनात 'पाणवठी तुंब निघेना' अशी ओळ आहे. समर्थ भारतभर फिरून साताऱ्यात राहिले पण मूळ प्रदेशातील भाषेशी संबध त्यांचा काही सुटला नाही असे लक्षात आले.

स्वदेश चित्रपटात शाहरुख त्याच्या अमेरिकन बॉसला म्हणतो 'I am going to visit places.' तसे मी म्हणतो I visited places and I visited persons. अनेक लोक आणि अनेक परिस्थितीतील लोक मी पाहिले आहेत. भयाण दुष्काळ, हातपंप लावल्यावर आनंदित होऊन मला तेथील घरात पाजलेला फक्त पाणी आणि चहा पावडरचा चहा आणि त्यातून मिळालेले समाधान हे महत्त्वाचे!

विविध प्रशिक्षणे





**राक्षसाचा प्राण कशात? ग्रामसभा हीच ग्रामविकासाची किल्ली!**

इतक्या सर्व अनुभवांचे 'निचोड' काय? पूर्वी गोष्टींमध्ये असायचे की राक्षसाचा प्राण पोपटात आहे. त्या गोष्टीची मला आठवण येते. ग्रामीण विकासाचे प्रयत्न जर यशस्वी व्हायचे असतील तर त्या गोष्टीप्रमाणे गावचा प्राण ग्रामसभेत आहे हे लक्षात घ्यायला लागेल. ग्रामसभा जितकी ताकदवान, उत्साही, सर्वांना सामावून घेणारी, परिणामकारक व विकासोत्सुक तितके गाव बलवान व संपन्न होणार. एका प्रकल्पात मी काही गावांमध्ये एक वर्ष ग्रामसभा सशक्त व्हावी म्हणून प्रयत्न केले. तसेच ज्या गावांमधून स्थानिक नेतृत्व उभे राहते तेथे विकासाच्या सर्व योजनांना गती मिळते हे ध्यानात आले. बाहेरून टेकू दिलेली विकासाची कामे कितीही पैसे ओतले तरी आतून पोकळच राहतात. जी गावे लोकसंख्येने जरा जास्त मोठी म्हणजे पाच हजार लोकसंख्येची आहेत, तेथे एकजूट होणे त्रासदायक असते. भाऊबंदकी, जुने वैर, हेवेदावे याचे प्रमाण जास्त असू शकते. चारशे-पाचशे लोकसंख्येच्या गावात कदाचित हे प्रमाण कमी असते. एका आमदारला आम्ही भेटलो तेव्हा एका सर्वेक्षणात प्रश्न विचारला की तत्त्वाचे राजकारण सध्या अस्तित्वात आहे का? असल्यास किती प्रमाणात? त्यावर ते म्हणाले, छे हो, तत्त्व कसले? भाऊबंदकीचे राजकारण सुरू आहे आपल्याकडे, अशाही काही प्रतिक्रिया लक्षात राहिल्या. अर्थातच माझ्या वैयक्तिक अनुभवांवर आधारित हे ठोकताळे आहेत. असे सर्वत्र असेलच असे मी म्हणणार नाही. पण 'ग्रामसभा सक्षमीकरण' व 'स्थानिक नेतृत्वाला पर्याय नाही' हे महत्त्वाचे घटक कार्य करीत असताना माझ्या लक्षात आले.

## नेतृत्व, सहविचार आणि बरेच काही

सहविचार म्हणजे निर्णय प्रक्रियेत अनेकांचा सहभाग असणे. तसे झाले तरच प्रत्येकाला तो निर्णय स्वतःचा वाटेल. सहविचारात मतभेदांना वाव आहेच. सहविचार आणि ट्रान्स्परन्सी एक प्रकारे बरोबरच जाणारी कल्पना आहे. ग्रामीण विकसनात Participatory Rural Appraisal (PRA) तंत्राचा खूप बोलबाला आहे. PRA म्हणजे सहविचारच! पूर्वी बिरबलाच्या एका कोड्याचे उत्तर असायचं ना, घोडा का अडला, भाकरी का करपली व पाने का सडली तर फिरवली नाहीत म्हणून तसे मी एक सोपे सूत्र मांडतोय की विकासाचे अनेक प्रकल्प का अडले? का थांबले? का मोडले? तर त्यात लोकांचा सहभाग नव्हता म्हणून! प्रबोधिनीतील दले ही या सहभागी पद्धतीची उत्तम उदाहरणे आहेत असे मला वाटते. आपण दलांतून आधी संपर्क करतो, मग सहभाग वाढवतो आणि मग उपक्रम राबवतो. प्रबोधिनीतून शिकलेल्या अनेक गोष्टींचा मला असा फायदा झाला.

विकासाची प्रेरणा आतूनच जागी व्हावी लागेल, ती तळमळ बाहेरून, योजनांमधून थोपविता येत नाही. ती कशी निर्माण होईल हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. काही ठिकाणी ती दिसते. काही ठिकाणी ती शून्यवत झालेली आहेत. योजना राबवून नुसते छापाचे गणपती स्थापन करून उपयोगाचे नाही, त्यात प्राण भरला पाहिजे. लोकसहभागाशिवाय तो निर्माण होणार नाही. ही आस्था व्यक्तीत, गटात, समाजात कशी जागी करायची याचे मुस्तकीम उत्तर नाही मात्र प्रयत्नाने ते साध्य होऊ शकेल हे नक्की!

## प्रत्येक गावाचे 'सामाजिक भांडवल'

या सगळ्या अनुभवांचे एक टोक कळत-नकळत प्रबोधिनीमधील शिक्षणातच जाऊन मिळते. एका गावात गटबांधणीचे काम करीत असताना एक व्यक्ती सतत विरोधी सूर लावत होती. त्यामुळे काम पुढे सरकत नव्हते. एकदा गावात गेलो असताना कळले की ती व्यक्ती व तिच्या कुटुंबातील एक जेष्ठ व्यक्ती गंभीर आजारी आहेत. प्रबोधिनीत लागलेल्या सहज सवयीप्रमाणे

मी त्या व्यक्तीच्या घरी जाऊन विचारपूस केली. मी ते सहजपणे केले पण या एका गोष्टीचा त्या व्यक्तीवर इतका परिणाम झाला की पुढच्या बैठकीपासून तिचा असहकार व अवाजवी विरोध करणारे वागणे पूर्ण बदलूनच गेले. खरंतर एखाद्याला भेटायला जाणे ही सवय मला दलामुळेच लागलेली होती. दलावर न आलेल्या आजारी मुलाच्या घरी जाऊन भेटणे हे जितक्या सहज होते तितकी ही सहज क्रिया होती.

या कामांच्या विस्तारात माझी गुणसंपदा नक्की वाढली. गावाचे संघटन व जागृतता निर्माण करण्याचे काही खास कौशल्य माझ्याकडे आहे असे मला नेहमी वाटते. 'सोशल मोबिलायझेशन' करण्याची ही काहीशी कलाच माझ्यामध्ये आहे. एका गावात विकास कामांसाठी एकूण ५० हजार रुपयांची लोकवर्गणी जमा करायची होती. स्थानिक आमदारांनी सुरुवातीला दिलेले २००० रुपये सुद्धा परत करण्याची नामुष्की त्या गावावर आली होती. वर्गणी न जमल्याने प्रत्येक घरातून अमुक एक रक्कम मिळून ५० हजार रुपये जमा झाले नव्हते. १२३ कुटुंबांकडून माणशी अमुक रक्कम जमा करणे असा तो हिशोब होता. मी त्या गावात सार्वजनिक पारावर बसून सर्व हिशोब मांडायला सुरुवात केली. महत्त्वाचे म्हणजे एकट्याने कार्यालयात कॉम्प्युटरवर हिशोब ठेवण्याऐवजी सर्व हिशोबाचे आकडे सार्वजनिक झाले. पारदर्शकता व सामुहिकता ही दोन महत्त्वाची तत्त्वे आपसूकच लोकांना माझ्या कृतीतून दिसली. त्यामधून वर्गणी जमा झाली हे वेगळे सांगायला नको.

**बसमधून दिसणारी दुपार**

**ही भकास गावे कोसळली धवळारे**
**ते उजाड डोंगर खराटलेली झाडे**
**या नद्या कोरड्या वाळूची कोठारे**
**अतृप्त मृदा अन वखवखलेली शेते ।।**
**ओसाडीतूनी शोधीत पाणी कुणी बापुडी फिरते**
**खरवडण्या पाण्याचे उष्टे हाती करवंटीही असते**
**कुणी उगाच जाळीती वैरण करती काळी शेते**
**सस्यशामल या देशाचे चित्र हेच दिसते ।।**

अशा अनेक अंगांनी ग्रामीण प्रश्नांचे व त्यावरील उत्तरांचे भान आले. प्रत्येक गावचा म्हणून काहीतरी एक स्वभाव असतो. त्या-त्या गावचे म्हणून काही 'सोशल कॅपिटल' असते. शहरीकरणाच्या रेट्यात गावपण वेगाने हरवते आहे. अनेक गावांमधील दीर्घकालीन समस्या अजूनही तशाच आहेत. पाणी प्रश्न आपण सोडवून टँकरमुक्त गावे आजही करू शकलेलो नाही. काही यशोगाथा दिसतात. काही दूरदृष्टीच्या योजनांची फळे आपण आज चाखतो आहोत. शंभर टक्के शासकीय अनुदानातून शरद पवार यांनी मुख्यमंत्री असताना फळ विकास योजना राबवली. त्याचे फलस्वरूप आज आपण बोरांपासून, सीताफळे-संत्री-चिक्कू यांची उपलब्धता प्रचंड वाढलेली अनुभवतो आहोत. पश्चिम महाराष्ट्रातील दूध व्यवसायाचे आणखी एक यशस्वी उदाहरण आहे.

शेती व शेतकरी तर जगलाच पाहिजे पण शेतीवरचे कुटुंबांचे अवलंबित्व कमी-कमी व्हायला हवे. एकीकडे शेतीची उत्पादकता वाढविणे व दुसरीकडे शेतीला पूरक जोडधंदा याची जोड देणे असे व्हायला हवे. शहरांमधील गर्दी न वाढता तालुक्याची व मध्यम आकाराची शहरे रोजगार निर्मितीची केंद्रे व्हायला हवीत. या संदर्भात प्रबोधिनीचे अनंतराव अभंग यांनी काही मांडणी केली आहे. त्यावर भविष्यात काम होण्याची आवश्यकता आहे. शहरात जाण्याचा रस्ता उपलब्ध आहे पण ते स्थलांतर बिकट परिस्थितीतून उद्भवलेले आहे. पलायन नको, डिस्ट्रेस मायग्रेशन नको. वाढत्या पैशाबरोबर बचत गट, महिला संघटना, युवक संघटना अशा अनेक आघाड्यांवर गावात विकास व्हायला पाहिजे. **अनेक गावात अजूनही 'स्थितीशीलता' आहे. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' अशी अगतिकतेची भावना आहे. या वृत्तीला कोणीतरी 'धक्का' दिला पाहिजे. ज्या गांवांमध्ये हा धक्का बसतो तिथे चलनवलन चालू होते. गावातील सुप्त ऊर्जेला वाट करून दिली पाहिजे. पोपटराव पवार यांच्यासारख्या वृत्तीचे अनेक संघटक गावात तयार झाले पाहिजेत. तर गावात काही चलनवलन सुरू होईल. संस्थात्मिकरणाबरोबरच ग्रामस्थांची प्रेरणा वाढवून कामे उभी करायला हवीत. हे बोलणे सोपे आहे पण कृतीत उतरवणे आव्हानाचे आहे!**

आता मी साठीच्या आसपास आहे. यापुढे स्वप्न म्हणजे संशोधन, प्रशिक्षण यातून पुन्हा एकदा कृतिकार्यक्रम घेऊन, ॲक्शन मोडमध्ये जाणे. कधी? केव्हा? कसे? हे सांगता येणार नाही. पण जेथून मी सुरुवात केली त्याकडे पुन्हा नक्की जायला आवडेल.

आज मागे वळून बघताना जे काही झाले ते वडिलांनी दिलेले स्वातंत्र्य आणि पत्नीने दिलेली साथ यामुळेच शक्य झाले याचा उल्लेख करावा लागेल. केंद्र सरकारच्या एका विभागात २१व्या वर्षी नोकरी मिळाली ती आठच दिवसात सोडून मी प्रबोधिनीने योजलेल्या सद्भावना यात्रेसाठी पंजाबला गेलो. एका बहुराष्ट्रीय कंपनीत मिळालेली नोकरी तीन महिन्यांत सोडून मी कुठल्या गावी कामासाठी निघून गेलो. वडिलांनी न रागावता हे सारे करू दिले. विवाहानंतर संसाराची सर्व जबाबदारी पत्नीने उचलली त्यामुळेच हे थोडे कलंदर आयुष्य जगता आले, त्या दोघांप्रती कृतज्ञतेची भावना आहे.



आई–वडील, पत्नी व बहिणींबरोबर



पत्नी, मुलगी, मुलगा व सूनेबरोबर



स्नफीबरोबर

**प्रबोधिनीशी अतूट नाते**

विवेक सरांबरोबर अनेक सर्व्हेच्या कामांमध्ये मी सहभागी झालो. ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेशच्या ट्रस्टवर मी ट्रस्टी म्हणून काम करतो. सुभाषराव जेव्हा जे काम सांगतात ते करण्याचा प्रयत्न करतो. माझ्या क्षेत्रातील जी कामे येतील ती प्रबोधिनीसाठी करायला मी नेहमी तयार असतो. सुभाषराव प्रबोधिनीच्या कामाव्यतिरिक्त बाहेरही अनेकदा भेटतात. जर्मन बँकेच्या ग्रामविकासाच्या कामात, दिल्लीच्या एका संस्थेच्या कामाच्या प्रोजेक्टमध्ये सुभाषराव आणि मी एकत्र काम केलेले आहे. वर्गमित्रांशी चांगल्या संपर्कात आहे. खरेतर आमचे सारे कुटुंब प्रबोधिनीशी जोडले आहे. माझी पत्नी डॉ. उर्मिला प्रज्ञा मानस विभागाशी संपर्कात आहे, माझा मुलगा सुशील काही काळ युवक विभागात होता. माझ्या बहिणी गीता तांबे व प्रिया मुळे या युवती विभागाशी संपर्कात आहेत. १९६९ मध्ये प्रबोधिनीबरोबर चालू झालेला प्रवास आजही चालूच आहे !



**९ जून २०१९ ज्ञान प्रबोधिनी प्रशालेला**
**५० वर्षे पूर्ण झाली त्या निमित्त**

ज्ञात्यांची येथे जमवून मांदियाळी
नवनिर्माणाची आस बाणवून अंगी
प्रसवतात जेथे कार्यसिद्धीच्या उर्मि
बोलती स्वराने उच्च, राष्ट्रभक्तीची गाणी
धिक्कार अकर्मण्याचा, हतबल नैराश्येचा
नीत पथिक आचरत येथ मार्ग ध्येयाचा
प्रज्ञेला शोभत कोंदण कर्मसुमांचे
शालीन फेडतील ऋण समाज पुरुषांचे
लाभो किर्त यश दिगंत येथे घडोत संघ नेत्याचे



वर्गमित्रांबरोबर वरोती गावाला भेट
तेथील विहिरीसाठी अर्थसाहाय्य

## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- Life is beautiful व संजीव कुमारचे हिंदी चित्रपट

२. आवडते पुस्तक - 'हिंदू - जगण्याची समृद्ध अडगळ' - भालचंद्र नेमाडे
'पांगिरा' - विश्वास पाटील यांचे ग्रामीण जीवनावरील पुस्तक

३. तुमचा छंद /आवड - कविता स्फुरतील तेव्हा, प्रवास

४. पहिली प्रतिक्रिया

- ग्रामविकसन - 'या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलूनी यावी' ही रामभाऊंची कविता
- संशोधन - कार्यप्रवण करणारे असावे
- सरकारी योजना - सत्पात्री आणि सुजाण लाभार्थी त्यांचे कल्याण करून घेतात.
- आप्पा पेंडसे आणि आण्णा - मी त्यांचा भक्त जास्त आहे! चिकित्सक वृत्तीने समीक्षा करू शकत नाही.
- ज्ञान प्रबोधिनी- ती नसती तर मी असा झालो नसतो.

५. पुन्हा एकदा जर आयुष्य नव्याने जगायची संधी मिळाली तर काय व्हायला आवडेल?
-भस्मिभूतस्य देहस्य पुनरागमनम कुतः
पु.शि.रेगे सावित्री मध्ये लिहितात - फार मागचे आठवू नये फार पुढचे ठरवू नये

**प्रमोद प्रभाकर सडोलीकर**
**9850438843**
**pramodsadolikar@gmail.com**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे   संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org